स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिक शास्त्रातील पीएच.डी (इतिहास) पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा.

-: संशोधन विषय :-

“हैद्राबाद मुक्ती संग्रामातिल मराठवाड्यातील एकविस रत्ने”

संशोधक

श्री. कांबळे विकास यशवंता

एम.ए., डी.एड., एम.फिल,(इतिहास).

मार्गदर्शक

डॉ. व्ही.व्ही कदम

(एम.ए.एम.फिल., पीएच.डी)

विभाग प्रमुख,

पदवी व पदव्युत्तर इतिहास

हु.ज.पा. महाविद्यालय हिमायतनगर, नांदेड.

2017

1) प्रास्ताविक :-

मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक प्रशासकीय विभाग आहे. या विभागात औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड परभणी व हिंगोली या जिल्ह्याचा समावेश आहे. मराठवाडा विभाग हा महाराष्ट्र स्थापनेपूर्वी हैद्राबाद संस्थानात होता. पूर्वी या भागाला निजाम प्रांत असे ओळखले जात असे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर ब्रिटिशांचे राज्य असले तरी अनेक छोटी छोटी राज्य ब्रिटीशांचे मांडलिकत्व पत्करुण विविध भागावर राज्य करीत होते. ब्रिटिश राज्यात सामाजिक शैक्षणिक सुधारणेबरोबरच स्वातंत्र्याची संकल्पना रुजत असतांना या छोट्या राज्यातून सर्वत्र अंधकार पसरलेला होता.

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करण्याची महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा आहे. मध्ययुगीन काळात श्री. छत्रपती शिवाजी महाराजांनी ही गौरवशाली परंपरा निर्माण केली. महाराष्ट्रातील स्वराज्यासाठी मावळ्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. अगदी अलिकडच्या काळात मातृभूमींच्या गुलामींच्या श्रृखला तोडण्यासाठी अनेक शुर वीर देशभक्तींनी हौतात्मे पत्कारले त्याच प्रमाणे मराठवाड्यातील जनतेने हैद्राबाद मुक्ती संग्रामात महत्व पूर्ण भूमिका बजावली. त्याग व बलिदानांची महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा कायम ठेवून स्वामीजींच्या नेतृत्वाखाली एक ऐतिहासिक कार्य पार पाडले.

स्वामी रामानंद तीर्थ व शेकडो स्वातंत्र्य सैनिकांच्या खडतर प्रयत्नातून हैद्राबाद मुक्तिसंग्राम यशस्वी झाला. भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व लाभले निजामाच्या राज्यातच मराठवाडा समाविष्ट होता. एकूण 224 वर्षे हैद्राबादच्या निजमाचे राज्य मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकावर होते. हैद्राबाद संस्थानात एकूण सात निजाम होऊन गेले. या प्रत्येक निजामाने हुकुमशाही प्रवृत्तीनेच राजकारभार केला. ब्रिटिश राजवटीच्या काळात भारत 563 संस्थेने होती. संस्थानाचा राजकारभार देशी संस्थानिक पाहत असत. दक्षिण भारतात हैद्राबाद, कोल्हापूर व नागपूर ही तीन संस्थाने होती. इ.स. 1724 ते1948 या कालखंडात हैद्राबाद संस्थानात आसफिया घराण्याची सत्ता होती. हैद्राबाद राज्याचा व आसफिया घराण्याचा

संस्थापक मीर कमरूद्दीन उर्फ निजाम- उल्-मुल्क हा होता. त्याने 1724 साली हैद्राबाद या ठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याच्या गादीवर वंशपरांपरेने येणाऱ्या सत्ताधिशाला निजाम या नावाने ओळखण्यात येत असे. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश स्वतंत्र झाला ; परंतु निजामाने आपले राज्य स्वतंत्र्य ठेवण्याची घोषणा केली. अर्थात हैद्राबाद राज्याला स्वतंत्र वेगळ्या राष्ट्राचा (दक्षिण पाकिस्तान) दर्जा प्राप्त करुन देण्याचा निजामाचा मानस होता. आपल्या संस्थानाला स्वतंत्र मुस्लिम राज्याचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले याचा उद्देशाने त्याने रझाकार संघटना, इत्तेहादुल मुसललीम यासारख्या अनेक संघटनांना हाताशी धरुन आपल्या संस्थानातील जनतेवर अन्याय अत्याचार करुन प्रचंड दहशद निर्माण केली होती. हिंदू समाजामध्ये पराकोटीची (आर्थिक सामाजिक, राजनैतिक) विषमता वाढली होती.

हैद्राबाद संस्थानातील बहुसंख्य जनता हिंदू तर केवळ 11% जनता मुस्लिम होती. तरी ही मुस्लिमांचा वरचस्मा सर्वच क्षेत्रात होता. त्यामुळे मुस्लिम जनताही हिंदूचा अतोनात छळ करित असे प्रचंड शैक्षणिक दुरावस्था व कमालीचे दारिद्र्य यामुळेही संस्थानातील जनता मरन यातना भोगत होती. अशाही परिस्थितीत हैद्राबाद संस्थानातील जनतेला अशा होती की, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांनाही स्वातंत्र्य मिळेल परंतू निजामाने आपल्या अतिरेकी महत्वकांक्षांमुळे हैद्राबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण होऊ दिले नाही. मात्र स्वामी रामानंद तिर्थ व त्याच्या सहकार्याने सतत 10-11 वर्षे निकराची झुज दिली. या झुंजला संजीवनी देण्याचे महनीय कार्य महाराष्ट्र परिषदा, स्टेट कॉंग्रेस, सामाजिक शैक्षणिक परिषदा, सांस्कृतिक चळवळी, आर्य समाज व हिंदू महासभेची आंदोलने, जंगल सत्याग्रह, वंदे मातरम् चळवळ, नांदेडचा झेंडा सत्याग्रह, यासारख्या विविध चळवळी बहादर स्वातंत्र्य सैनिकांनी अर्थात अनेक क्रांतीकारकांनी स्वामी रामानंद तिर्थ यांच्या सक्षम नेतृत्वा खाली हा लढा यशस्वीपणे पार पाडले. शून्यातून विश्व निर्माण केले व अशक्य गोष्ट शक्य करुन दाखविली. काल्पनिक ध्येय सृष्टी प्रत्यक्षात अवतीर्ण झाली निजामशाही संपुष्टात आली. स्वातंत्र्य सैनिकांनी निजामाचे स्वप्न धुळीस मिळविले. निजाम हा अन्यायी व अत्याचारी होता, थोडक्यात संस्थानातील मुस्लिम लोक सोडून इत लोकाने जीवन गुलामापेक्षा वेगळे नव्हते. याशिवाय

देशांच्या मध्यभागी असलेले हैद्राबाद राज्य स्वतंत्र रहाणे देशाच्या आणि जनतेच्या हिताचे नव्हते. त्यामुळे हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी याराज्याीतील जनतेने 7 ऑगस्ट 1947 पासून संघटितपणे सशस्त्र आंदोलनास सुरूवात केली. शेवटी 13 सप्टेंबर 1948 रोजी भारत सरकारने लष्करी कारवाई केली. अशा प्रकारे हैद्राबाद संस्थानातील जनतेला 13 महिने पारतंत्र्यातच राहावे लागले. म्हणुन भारतीय स्वातंत्र्य लढ्याला खऱ्या अर्थाने पूर्णत्व मिळाले ते 17 सप्टेंबर 1948 लाच. तथापि 17 सप्टेंबर 1948 रोजी निजामाने भारतीय लष्करापुढे शरणागती पत्करली. हैद्रबादचे राज्य भारतीय संघराज्यात विलीन झाले. अशा रीतीने भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सांगता हैद्राबाद संस्थानातील पोलीस कारवाईने झाली असे म्हणावे लागेल.

हैद्राबाद संस्थानात आसफिया घराण्याचे झालेले निजाम :-

1) मीर कमरुद्दीन - पहिला निजाम -इ.स. 1724 - 1748
2) नासिरजंग इ.स. 1748 -1750
3) मुजफ्फरजंग - इ.स. 1750 - 1751
4) सालाबतजंग - इ.स. 1751 - 1763
5) निजाम - उल - मुल्क - दुसरा निजाम - इ.स. 1763 - 1803.
6) सिकंदर अलीखॉ - तिसरा निजाम - इ.स. 1803-1829
7) नबाब अफजलुदौला - चौथा निजाम इ.स. 1829-1857
8) नबाब अफजलुद्दोला - पाचवा निजाम - इ.स. 1857 -1869
9) महबूब अलीखॉ - सहावा नियम - इ.स. 1869 - 1911
10) मीर उस्मानअली शेवटचा - सातवा निजाम - इ.स 1911 - 1948

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा हा जनसामान्याचा लढा होता व त्यात मराठवाड्यातील बहुसंख्य समाज सामिल झालेला होता या लढ्यात अनेक ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांनी त्यांचे योगदान दिले आहे. त्यापैकी एकविस स्वातंत्र्य सैनिकांचा अभ्यास या शोध प्रबंधातून घेण्यात येणार आहे. एकूण सात प्रकरणांच्या माध्यातून हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील (मराठवाड्यातील एकविसरत्ने) हा प्रबंध तयार केला गेला आहे.

या निजामाच्या जुलमी प्रवृत्तीला अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी संघर्ष केला. त्यापैकी मराठवाड्याच्या मुक्ततेसाठी काही स्वातंत्र्य सेनानीची, विरांची संघर्ष कथा संकलित करुन शास्त्रीय पध्दतीने मांडण्याचा संकल्प प्रस्तूत संशोधकाने केला आहे.

“हैद्राबाद मुक्ती संग्रामातिल मराठवाड्यातील एकविस रत्ने”

1) प्रणेते स्वा.से. स्वामी रामानंद तीर्थ
2) हु. गोविंद पानसरे
3) स्वा.से. गोविंदभाई श्रॉफ
4) स्वा.से. आ.कृ. वाघमारे
5) हु. बर्हिजी शिंदे
6) स्वा.से. अनंतराव भालेराव
7) स्वा.से. श्यामराव बोधनकर
8) स्वा.से. दिगांबरराव बिंदू
9) स्वा.से. गोविंदराव नानल
10) स्वा.से. विनायकराव चारठाणकर
11) स्वा.से. भगवानराव गांजवे
12) स्वा.से. काशिनाथराव वैद्य
13) स्वा.से. शंकरराव चव्हाण
14) स्वा.से. साहेबराव बारडकर
15) स्वा.से. भाई केशवराव धोंडग
16) स्वा.से. लक्ष्मणराव सोनकांबळे
17) स्वा.से. दगडाबाई शेळके
18) स्वा.से. शकुंतलाबाई साले
19) स्वा.से. आशाताई वाघमारे
20) स्वा.से. काशिबाई किर्लोसकर
21) स्वा.से. ताराबाई परांजपे

2) विषयाची निवड :-

शालेय जीवनातील इतिहास शिकत असतांना पाठ्य पुस्तकामध्ये महाराष्ट्राचा इतिहास शिकत असतांना त्यातल्यात्यात मराठवाड्याचा इतिहास जास्त प्रमाणात आढळत नाही, मात्र समाजातील वयोवृध्द व्यक्तीकडून मात्र निजाम, निजामाचे राज्य, रजाकार या विषयाच्या गोष्टी ऐकावयास मिळत. आपल्या विभागाचा इतिहास जाणून घेण्याचा आंतरीक तळमळीने हैद्राबाद मूक्ती संग्रामामध्ये संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली. संशोधनाची व्याप्ती लक्षात घेता प्रस्तुत संशोधन हे या मुक्ती संग्रामात स्वत:ला वाहून घेतलेले आहे. प्रस्तुत लघु शोध निबंध हैद्राबाद मुक्ती संग्राम मधील (21) एकविसरत्ने या विषयावर संशोधन करुन त्यांच्यावर प्रकाश टाकरण्याचा प्रयत्न करणार आहे.

3) संशोधन पध्दती :-

हैद्राबाद मुक्ती संग्रामामधील मराठवाड्यातील (21) एकविसरत्ने या विषयाच्या दृष्टिकोनातून प्रकाशित असलेले साधने व संग्रहीत महत्वाचे असतात. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील वर्तमानपत्रे, नियतकालीके, संदर्भग्रंथ प्रकाशित झाले. मराठी, हिंदी, इंग्रजी, भाषेमधील वृतपत्र हैद्राबाद मुक्ती संग्रामामधील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये सादर झालेले एक शोध प्रबंधक यांच्या सह्याने हा शोध प्रबंध तयार करावयाचा आहे. यासाठी ;

1) सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दती

2) संदर्भ संशोधन पध्दती

3) विश्लेषणात्मक पध्दती

4) मुलाखात पध्दतीचा उपयोग करावा लागेल.

4) उद्देश :-

1) आज सद्य:स्थितीमध्ये हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या बाबतीत विपुल प्रमाणात लिखान झाले असले तरी, मराठवाड्यातील लोकांच्या योगदानाबाबत म्हणावे तेवढे लिखान झालेले नाही, ही अडचण लक्षात घेऊन समर्पकपणे लिखान कराण्याचा माझा मानस आहे. जे की हा विषय सर्वसमाजातील लोकांसाठी प्रेरणादायक ठरणार आहे व भावी संशोधकास, वाचकास, उपयोगी पडावा हा या विषय निवडी मागचा उद्देश आहे.

2) हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र सैनानीची माहिती मिळविणे.

3) हैद्राबाद मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या (21) एकविसरत्ने विषयी शोध घेणे.

4) हैद्राबाद मुक्ती संग्रामातील सहभाग घेतलेल्या (21) एकविसरत्ने अभ्यास करणे व ऐतिहासीक दृष्टीकोनातून आढावा घेणे.

5) गृहितके :-

1) मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा हा इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.
2) मराठवाडा मुक्ती संग्राम कालीन सामाजिक व राजकिय घडामोडीचा आढावा महत्वाचा आहे.
3) हैद्रबाद मुक्ती संग्रामात हैद्राबाद मुक्तीसाठी अनेक व्यक्तीने प्राणाचे बलिदान केले आहे. मराठवाडा प्रदेश स्वातंत्र्य पूर्ण काळात निजामाच्या वर्चस्वाखाली होता.
4) राष्ट्रीय एकात्मता, शांतता सुव्यवस्था, अबाधित राहावी यासाठी हैद्राबाद संस्थानाचे विलीनिकरण भारतीय संघराज्यात करणे आवश्यक होते.
5) प्रस्तुत एकविसरत्नांच्या कार्यावरून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यत्तर इतिहासातील महत्वाच्या घटनांचा आढावा घेता येतो.

6) विषयाचे महत्व :-

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासीक दृष्टीकोनातून मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा हा महत्वाचा आहे. या लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांनी केलेल कार्य हे याद्वारे जाणून घेण्यास मदत होईल. याचबरोबर स्वातंत्र्य सैनिकाच्या कार्याचा अभ्यास करत असतांना त्या काळातील राजकीय परिस्थिती व त्याचा समाजमनावर होणारा परीणाम या ही गोष्टीचा उलगडा होईल. तरूण पिढीला हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनांनी लढवय्येयांच्या जीवन चरित्राची माहिती होण्यास मदत होईल.

7) विषय मर्यादा :-

मराठवाडा मुक्ती संग्राम अंतर्गत झालेल्या घडामोडी व स्वातंत्र्य सैनानीचे कार्य एवढ्यापुरताच हा विषय मर्यादित आहे. प्रस्तुत निवडलेल्या एकविसरत्नाचा चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण - पहिले

1) प्रणेते, स्वा.से.स्वामी रामानंद तीर्थ
2) हु. गोविंदभाई पानसरे
3) स्वा.से. गोविंदभाई श्रॉफ
4) स्वा.से. आ.कृ. वाघमारे

यांचा हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील योगदान / कार्य.

प्रकरण - दुसरे

1) हु. बर्हिजी शिंदे
2) स्वा.से. अनंतराव भालेराव
3) स्वा.से. श्यामराव बोधनकर

यांचा हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील योगदान / कार्य.

प्रकरण - तिसरे

1) स्वा.से. दिगांबरराव बिंदू
2) स्वा.से. गोविंदराव नानल
3) स्वा.से. विनायकराव चारठाणकर

यांचा हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी योगदान / कार्य.

प्रकरण - चौथे

1) स्वा.से. भगवानराव गांजवे
2) स्वा.से. काशिनाथराव वैद्य
3) स्वा.से. शंकरराव चव्हाण

यांचा हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी योगदान / कार्य.

प्रकरण - पाचवे

1) स्वा.से. साहेबराव बारडकर

2) स्वा.से. भाई केशवराव धोंडगे

3) स्वा.से. लक्ष्मणराव सोनकांबळे

यांचा हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी योगदान / कार्य.

प्रकरण - सहावे

1) दगडाबाई शेळके

2) शकुंतलाबाई साले

3) आशाताई वाघमारे

4) ताराबाई परांजपे

5) काशिबाई किर्लोसकर

हैद्राबाद मुक्ती संग्रामातील या महिलांचे योगदान

प्रकरण - सातवे

निष्कर्ष :-

एकुणच जे सात प्रकरणाचे प्रस्तुत प्रबंधासाठी वर्गीकरण केले असून निष्कर्षामध्ये साधनांची सत्यता तपासून योग्य व ऐतिहासिक संशोधनात्मक दृष्टीकोनातून निष्कर्ष काढण्यात येईल.

नोट :

हा संशोधन आराखडा स्थूल स्वरूपाचा असून साधनांच्या उपलब्धतेनुसार त्यात बदल होण्याची शक्यता आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. सेतू माधवराव पगडी : हैद्राबादेतील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, (1956).
2. अनंतराव भालेराव : हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, स्वा.रा.तीर्थ संशोधन संस्थाआणि भारत मुद्रक आणि प्रकाशक लिमिटेड, औरंगाबाद (1987).
3. वि.पा. देऊळगावकर : युगप्रवर्तक स्वामी रामानंद तीर्थ, स्वा.रा.ती.म संशोधन संस्था, गुलबर्गा (1998).
4. अमृत गडकरी, गुणवंत करडखेडकर : मंतरलेले पाणी (हैद्राबाद मुक्तिसंग्राम-समाजवादी उठाव), साधन प्रकाशन, पुणे (1990)
5. पुरूषोत्तम चपवळगावकर : घडून गेलेली गोष्ट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे (1992).
6. सुरेंद्र बारलिंगे : ओंजळभर पाणी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे (2000).
7. न्या. नरेंद्र चपळगांवकर : कहाणी हैद्राबाद लढ्याची, देशमुख आणि कंपनी पुणे (1999).
8. डॉ.पी.जी. जोशी : मुक्तिगाथा- मुक्तिदाता (हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ) प्रकाशक क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड. 2009.
9. नरहर कुरुंदकर : हैद्राबाद - विमोचन आणि विसर्जन, द.प. जोशी (संपा.) मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद (1985)
10. भगवान काळे (संपा.) : मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना (1986)

11. शाम अग्रवाल : हुतात्मा बहिर्जी, हु.ब.स्मा.वि.प्रकाशान, वसमतनगर (1998)

12. डॉ. ताराबाई परांजपे : संन्यस्त स्वातंत्र्यसेनानी पू. स्वामी रामानंद तीर्थ, निर्मल प्रकाशन, नांदेड (1997)

13. डॉ. शिवाजी गऊळकर : निर्मोही (गोविंदभाई श्रॉफ यांचे चरित्र), निर्मल प्रकाशन, नांदेड (1998)

14. अशोक पारळीकर : हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील ओजस्वी कथा, नटराज प्रकाशन, परभणी

15. सुधाकर डोईफोडे : प्रतर्दनाचे दिवस, निर्मल प्रकाशन, नांदेड (1999).

16. सेतू माधवराव पगडी- निजाम- मराठे संबंध (1952

17. प्रा. बालाजी चिरडे - भारतीय महिलांचा इतिहास.

18. प्रा.एस.एस. भांडवलकर/ प्रा.यु.एस. हनवते - मराठवाड्याचा इतिहास.

19. डॉ. जोत्स्ना घारपूरे - अशा झुझलो आम्ही.

20. डॉ. अनिल कठारे / डॉ. नगराळे - मराठवाड्याचा इतिहास.

21. भाई केशवराव धोंडगे - हैद्राबाद मुक्ती लढ्यातील मन्याड खोरी विजयी कारगील शौर्यगाथा.

22. Dr. B.S. Dhengle- Memoirs of Hyderabad Freedom Struggle Swami Ramanand Teerth.

23. Deulgaonkar V.P. : Rashtraveera Swami Ramananda Teertha, S.R.T.I. Gulbarga.

24. Khodwe Achyut : People's Movement in Hyderabad, Chandra Prakashan, Nanded (1982).

25. Kate P.V. : Marathwada Under The Nizams (1978).

मार्गदर्शक

डॉ. व्ही.व्ही कदम

एम.ए.एम.फिल,पीएच.डी.

पदवी, व पदव्युत्तर इतिहास विभाग,

हुतात्मा जयंतराव पाटील महाविद्यालय,

हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड

संशोधक

श्री. कांबळे विकास यशवंता

एम.ए.,डी.एड., एम.फिल, (इतिहास)